194

पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
3 रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे 411001.
पीबीएक्स 020 – 26126628 /26126785/ 26114064. फॅक्स 020 – 26127004/26132401.
Email: - dirmktms@gmail.com Website: www.msamb.com

जा.क्र.पणन-1/कापूस बाजार फी/परिपत्रक/2011.

दिनांक : 23 सप्टेंबर, 2011.

: परिपत्रक :

मॉडेल ॲक्टच्या धर्तीवर राज्य शासनाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 व नियम 1967 व त्या अंतर्गत असलेल्या नियमांमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. राज्यामध्ये आजपर्यंत 15 खाजगी बाजारांना नियम क्रमांक 4 (सी) अंतर्गत अनुज्ञप्ती देण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकाव्दारे राज्यातील सर्व बाजार समित्या व खाजगी बाजारांना असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, शेतमाल खरेदीवर शासनाने अधिसूचनेव्दारे घालून दिलेल्या मर्यादेमध्ये बाजार फी आकारणे हे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 मधील कलम 31 अन्वये खाजगी बाजार व बाजार समित्यांना बंधनकारक आहे. तसेच कलम 5 (ड) चे उपकलम 6 (अ) मधील तरतुदीनुसार कलम 31 हे खाजगी बाजारांना लागू आहे. खाजगी बाजारांना देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीमधील अटीनुसार शासनाने बाजार फी व देखरेख फी बाबत वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके व आदेश खाजगी बाजारांना बंधनकारक आहेत.

शासनाने कलम 31 अंतर्गत निर्गमित केलेल्या दिनांक 7 ऑक्टोबर 86 च्या अधिसूचनेन्वये बाजार फीचे दर प्रती 100 रुपये खरेदीवर कमीत कमी 75 पैसे ते जास्तीत जास्त 100 पैसे आकारणी करणे बंधनकारक आहे. तसेच शासनाच्या दिनांक 17 जून 2010 च्या महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 मधील कलम 31 अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेन्वये सन 2008-09 व 2009-10 या हंगामासाठी कापूस खरेदी योजनेंतर्गत कापूस खरेदीसाठी बाजार समितीने प्रती 100 रुपयाच्या खरेदीवर एक रुपया बाजार फी व देखरेख फी पती 100 रुपयास 5 पैसे आकारणे बंधनकारक केलेले आहे.

शासनाने निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार राज्यातील सर्व बाजार समित्यांनी व खाजगी बाजारांनी दर आकारणी करावी. शासनाच्या अधिसूचनेचे उल्लघन खाजगी बाजाराकडून होत असल्यास जिल्हा उपनिबंधक यांनी अशा खाजगी बाजारांची तपासणी त्वरीत करून पुढील कार्यवाहीसाठी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

मा.पणन संचालक यांचे मान्यतेने .

पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.यांचे करिता

प्रति,

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

1. कृषि उत्पन्न बाजार समिती, (सर्व)
2. खाजगी बाजार (सर्व)

प्रत :

1. मा.मंत्री (कृषि व पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-32.
2. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-32.
3. स्विय सहायक, मा.प्रधान सचिव (कृषि व पणन) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-32.